राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in
Web: www.ropune.org.in

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२/ब,तिसरा मजला,तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-१/प्रशिक्षण/२०२३/ 3262

दिनांक - 26 JUL 2023

प्रति,

प्राचार्य
सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये /
शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था

विषय -- तासिका तत्वावर निमंत्रित अभ्यागत अधिव्याख्यात्यांच्या नेमणूकीबाबत...

संदर्भ- मा.संचालक तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.४अ/आस्था-१/२०२३/५६५ दिनांक २५/०७/२०२३

उपरोक्त संदर्भिय पत्रांचे अवलोकन करावे. सदर पत्रातील सुचनेनुसार आपल्या संस्थेत निमंत्रित अभ्यागत अध्यापकांच्या जाहिरात प्रकाशित करण्यापुर्वी/नेमणूक करण्यापुर्वी संस्थेतील संबंधित विषयांच्या शैक्षणिक कार्यभाराची व मंजूर पदांची खातरजमा करणेबाबत या कार्यालयांस निर्देशित केलेले आहे. त्यानुसार नियुक्त्यांबाबत कार्यवाही झाली किंवा कसे ? याबाबतची पडताळणी करणेसाठी आपल्या संस्थेचा तासिका तत्वावर नेमलेल्या अभ्यागत अध्यापकांच्या जाहिरातपासून ते नेमणूकची कार्यवाही केल्यापर्यंतचा संपूर्ण प्रस्ताव व्दिप्रतीत या कार्यालयांस दिनांक २७/०७/२०२३ पर्यंत सादर करावा.

सोबत-वरीलप्रमाणे

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

Endorsement

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र.०२२-68597473/424/434,
ई-मेल–desk4a@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: ४अ/आस्था-१/२०२३/ ५६५ दिनांक: 25 JUL 2023

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर.

**विषय** : आपल्या विभागातील पदवी/पदविका संस्थामधील तासिका तत्वावर निमंत्रित अभ्यागत अधिव्याख्यात्यांच्या नेमणूकीबाबत..

**संदर्भ** : उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण२०१६/प्र.क्र.(१००/१६)/तांशि-१ दिनांक १७ एप्रिल,२०२३

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील पदवी/पदविका संस्थामधील विविध अभ्यासक्रमातील काही पदे रिक्त असल्याने संस्थास्तरावर निमंत्रित अभ्यागत अध्यापकांच्या नियुक्त्या केल्या जातात. सर्वच शासकीय संस्थेतील द्वितीय पाळी बंद असताना सुद्धा त्या पाळीतील स्वतंत्र शैक्षणिक कार्यभार दर्शवून आवश्यकते पेक्षा जास्त निमंत्रित अभ्यागत अध्यापकांच्या नियुक्त्या करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर बाबतीत संस्थेतील शैक्षणिक कार्यभाराचा सर्वकष विचार करुनच निमंत्रित अभ्यागत अधिव्याख्यात्यांची नियुक्ती करणे अपेक्षित आहे. अशा नियुक्त्यांमुळे न्यायालयीन प्रकरणे सुद्धा उद्भवलेली आहेत. शासनाच्या संदर्भिय दिनांक १७ एप्रिल, २०२३ रोजीच्या शासन निर्णयामुळे तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध पदवी/पदविका अभ्यासक्रमांसाठी निमंत्रित अभ्यागत अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाचे दर सुधारित करण्यात आलेले आहेत.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता संस्थांमध्ये निमंत्रित अभ्यागत अध्यापकांच्या विषयवार जाहीराती प्रसिद्ध करताना आवश्यक तेवढ्याच शैक्षणिक कार्यभारानुसार तसेच द्वितीय पाळी चा स्वतंत्र विचार न करता कमीतकमी अध्यापकांच्या नियुक्तीकरिता संबंधित अभ्यासक्रमाच्या मंजूर पदांच्या मर्यादेत जाहीरात प्रकाशित करुन त्यानुसार अध्यापकांच्या नेमणुका करणेबाबतची कार्यवाही संस्थास्तरावर होणे आवश्यक आहे. अभ्यासक्रमनिहाय शैक्षणिक भार हा प्रथमत: नियमित अध्यापकांमध्ये विभागून तद्नंतर आवश्यकतेनुसार अभ्यागत अध्यापकांची नेमणूक करण्यास्तव निर्देशित करण्यात येत आहे.

यास अनुसरुन सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांना निर्देशित करण्यात येते की, आपल्या विभागातील संस्थामधील निमंत्रित अभ्यागत अध्यापकांच्या जाहीरात प्रकाशित करण्यापूर्वी/नेमणुक करण्यापूर्वी संस्थेतील संबंधित विषयांच्या शैक्षणिक कार्यभाराची व मंजूर पदांची खातरजमा करावी. त्यानुसारच नियुक्त्यांबाबत कार्यवाही झाली किंवा नाही याबाबतची पडताळणी करावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दिनांक ३१/०७/२०२३ पर्यंत सादर करावा.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
प्र.संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

आ/स्था-१ परिपत्रक निर्गमित करावे वेबसाईटवर
२५/०७/२३

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे
25 JUL 2023
आवक क्र....०२२२.......